# मराठीच्या समृध्दीसाठी बोलीभाषेलाही महत्व द्यायला हवे
# - काव्यस्पर्धेत अशोक बागवे यांचे प्रतिपादन

पनवेल (प्रतिनिधी) मराठी भाषेला अधिक मजबूत करण्यासाठी, मराठीच्या संवर्धन आणि समृध्दीसाठी महाराष्ट्रातील बोलीभाषांनाही महत्व दिले पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द ज्येष्ठ कवी अशोक बागवे यांनी शनिवारी येथे केले. अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेच्या पनवेल शाखेच्यावतीने नवकवी, शिघ्रकवी व बुजूर्ग कवी यांच्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावा आणि स्थानिक कवींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'आषाढस्य प्रथम दिवसे' अर्थात महाकवी कालिदास जयंतीचे औचित्य साधून शनिवारी शहरातील आशिर्वाद मंगल कार्यालयाच्या सभागृहात पनवेल व उरण तालुकास्तरीय 'काव्य' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यापसंगी मार्गदर्शन करताना बागवे बोलत होते.

आपली बोलीभाषा खणखणीत असणे हे एक चांगल्या कवीचे लक्षण आहे. महाराष्ट्रातील साहित्य निर्मितीत वऱ्हाडी, मालवणीनंतर आगरी भाषेलाही महत्व प्राप्त झाल्याबद्दल आपल्या भाषणातुन आनंद व्यक्त करून अशोक बागवे पुढे म्हणाले की, कवींमध्ये सौजन्य, हौस, छंद, व्रत, बंधूभाव आणि उपजत कला असावी लागते. स्पर्धेतील प्रत्येक स्पर्धक यशस्वी होईल असे नाही परंतु प्रत्येक यशस्वी स्पर्धक हा यशस्वी कवी होईल असेही नाही, याची जाणिव ठेवून नवकवींनी स्वतःचे परिक्षक होऊन सादरीकरण, शब्दोच्चार, लहेजा, आवाजातील चढउतार, वाचिक आणि अंगिक अभिनय या गुणांची आकलन केले पाहिजे. कवी रसिकांना आपल्या माधुर्याचा रस देणारा असावा, जेव्हा रसिक कलाकारात एकरूप होतो तेव्हा ती कविता सरस होते, असेही बागवे नवकवींना मार्गदर्शन करताना म्हणाले. प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या आपल्या भाषणातून बागवे यांनी साहित्य, नाटय, कविता गझल यांचा जवळचा संबंध असल्याचे स्पष्ट करून भारतीय संस्कृतीतील जडण-घडणीत असलेले महत्व स्पष्ट केले. तसेच महाराष्ट्रातील केशव सूतांपासून प्रकाश होळकरांपर्यंतचा काव्य प्रवास विषद केला. नाटय परिषदेने महाकवी कालिदासांचे स्मरण ठेवून काव्य स्पर्धेचे आयोजन केले हा एक रम्ययोग आहे असे सांगून अशोक बागवे यांनी आयोजकांना धन्यवाद दिले व प्रतिभावंत कवी घडविण्यासाठी परिषदेच्यावतीने शिबीराचे आयोजन करावे, अशी सुचनाही यावेळी केली.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, कविता हे शब्दांचे सामर्थ्य असणारे प्रभावी माध्यम आहे. महाराष्ट्राच्या परंपरेतील कविता, पोवाडा, स्फुर्ती गितांतून स्फुर्लिंग निर्माण झाले आहे. आमच्या पिढीवर काव्याने, साहित्याने आणि संस्कृतीनेच संस्कार केले. कुसुमाग्रजांसारख्या दिग्गज कवींच्या रचना आजही आमच्या ह्दयावर कोरल्या आहेत, अशा भावना व्यक्त करून महाराष्ट्राची काव्य संपदा फार मोठी असून पूर्वी काव्यवाचन कार्यक्रमही तिकीट लावून होत असत याची आठवण भावे यांनी करून दिली.

जात्यावरच्या ओवींमध्ये फार मोठी शक्ती आहे, त्यामुळे ओव्यांसारख्या लोकगितांचा अभ्यास नवकवींनी केला पाहिजे. कविता लिहताना त्या विषयाशी, शब्दांशी समारासमोर कवितेत झोकून दिले तर सरस कविता तयार होते असे सांगून सुप्रसिध्द गझलकार ए.के.शेख यांनी मुशायरा, गझल, कविता यातील परस्पर संबंध स्पष्ट केले.

स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून यावेळी यात अमुलाग्र बदल केलेले आहे असे स्पष्ट करून श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व नाटय परिषदेच्या माध्मातून सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी नाटय करंडक व काव्य स्पर्धांसारख्या विविध कार्यक्रमांचे वर्षभर आयोजन केले जाते, अशी माहिती स्पर्धेचे आयोजक तथा अखिल भारतीय मराठी नाटय परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी यावेळी दिली.

पनवेल व उरण तालुक्यांतील कवींकरिता आयोजित करण्यात आलेली ही स्वरचित कविता स्पर्धा शालेय आणि खुला अशा दोन गटात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये खुल्या गटासाठी पाऊस व हास्यकाव्य हे दोन विषय तर शालेय गटातील आवडत्या विषयानुसार स्पर्धा झाली. यात स्त्रीभ्रुण हत्या, आईवडील, बालपण, शाळा, शेजारधर्म, दहशतवाद, फेसबुक, स्त्री, आयुष्य, अश्रू, आभास, स्वप्न, पर्यावरण, पाऊस, श्रावण, आभाळ या विषयांसह महाराष्ट्रावर येणाऱ्या दुष्काळासारख्या आशयांच्याही काव्य रचना नवकवींनी सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. या स्पर्धेतील खुल्या गटात विजय वेंद्रे यांनी प्रथम, धनंजय गोधळी यांनी व्दितीय, तृतीय क्रमांक विशाल राजगुरू तर मच्छिंद्र पाटील यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक तसेच शालेय गटात प्रिया पार्टे हिने प्रथम, आदित्य म्हात्रे याने व्दितीय, कोमल मुरकुटे हिने तृतीय तर राखी पालांडे हिने उत्तेजनार्थ बक्षिस पटकाविले.

या कार्यक्रमास अखिल भारतीय मराठी नाटय परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष तथा प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, ज्येष्ठ कवीयत्री सुजाता पाटील, ॲड.प्रसाद पाटील, नगरसेविका निर्मला म्हात्रे, उद्योजक गंभीर दांडेकर, कथाकार मनिष तिवारी, पी.बी.हांडे, मावळ लोकसभा युवक कॉग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, गझल गायक हरिष ठाकूर, साहित्यिक मनिष पाटील, ज्येष्ठ कवी बाबा शिर्के, स्पर्धा प्रमुख स्मिता गांधी, प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सह कार्यवाह शैलेश कठापूरकर, कोषाध्यक्ष अमोल खेर आदी मान्यवर उपस्थित होते. या काव्य स्पर्धेचे परिक्षक म्हणून नारायण लाळे, एकनाथ आव्हाड,वसुधा दळवी यांनी काम पाहिले. तर सुत्रसंचालन प्रविण मोहोकर यांनी केले.

**कविता हा प्रत्येक मराठी मनाचा जिव्हाळयाचा विषय आहे. कवितेने मनाला बहर येतो, त्यामुळे हा संस्कृतीचा ठेवा बंधनात न ठेवता तो सर्वांसाठी खुला व्हावा व त्याची किर्ती सर्वांसमोर यावी, यासाठी नाटय, काव्य, वाचन अशा संयुक्तीकरित्या भव्य कार्यक्रम यापुढे पनवेलमध्ये आयोजित करण्याचा मानस आहे. - आमदार प्रशांत ठाकूर**